**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत संमत, राज्यघटनेच्या विरोधात जाणाऱ्यांना आळा घालण्यासाठी विधेयक आणल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- विधेयकातल्या कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना या शब्दाला विरोधकांचा आक्षेप, विधेयक असंवैधानिक असल्याचा माकपाचा दावा

- बिहारमध्ये मतदार याद्यांची विशेष पुनरीक्षण प्रक्रिया सुरू ठेवायला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी, निवडणूक आयोगानं साधलेली वेळ अनाकलनीय असल्याचं मत व्यक्त

- यंदाच्या आयपीएलमधल्या तिकीट घोटाळ्याप्रकरणी हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षांसह अनेक अधिकाऱ्यांना अटक

**आणि**

- अँडरसन-तेंडूलकर करंडक कसोटी मालिकेतल्या भारताविरुद्धच्या तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा इंग्लंडचा निर्णय

**<><><><><>**

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक आज विधानसभेत मंजूर झालं. याचा सविस्तर वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड - व्हाइस कास्ट**

*देशाच्या, राज्याच्या सुरक्षिततेसाठी आणि राज्यघटनेच्या विरोधात जाणाऱ्यांना आळा घालण्यासाठी हे विधेयक मांडलं आहे. याचा उद्देश कोणालाही त्रास देण्याचा नाही, याचा दुरुपयोग करायची मुभा कोणालाही मिळणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयक मांडताना दिली.*

***होल्ड - मुख्यमंत्री बाइट***

*सशस्त्र माओवाद संपत असताना दुसरीकडे शहरी नक्षलवाद बोकाळत असून त्याला आळा घालण्यासाठी अशा प्रकारचा कायदा करण्याची सूचना केंद्र सरकारनं केली आणि त्यानुसार एकंदर चार राज्यांनी असे कायदे आणले. मात्र, महाराष्ट्रात असा कायदा नसल्यामुळे राज्यात अशा संघटनांचं जाळं वाढत आहे. या संस्था मानवी हक्कांसाठी काम करत असल्याचं दाखवून माओवादी विचारांचा प्रसार-प्रचार करणं, त्यांना आर्थिक मदत*

*पुरवणं, त्यांना आश्रय देणं अशी कृत्यं करत असतात, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, गडचिरोली, कोकण, अमरावती या भागांमध्ये आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार करायचा या संघटनांचा उद्देश असल्याचं दिसून येतं, असंही फडणवीस यांनी नमूद केलं.*

*या विधेयकामुळे राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होईल, अशी शंका काँग्रेसचे नितीन राऊत यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान उपस्थित केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी, शहरी नक्षलवादाच्या नावावर याचा गैरवापर होऊ नये, याकडे लक्ष वेधलं. रोहित पवार यांनी या विधेयकातल्या 'कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना' या शब्दांवर आक्षेप घेत, याऐवजी 'माओवादी संघटना' असा शब्द वापरावा, असं सुचवलं. सरकारच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या सगळ्या संघटनांवर या कायद्यान्वये कारवाई करणार का, असा प्रश्न वरुण सरदेसाई यांनी मांडला. हे विधेयक असंवैधानिक असल्याचं सांगून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार विनोद निकोले यांनी याला विरोध केला. तर, या विधेयकाबद्दल गैरसमज पसरवण्याचा आरोप भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधकांवर केला.*

*'कडवी डावी विचारसरणी' हा शब्द विविध कायद्यांमधून तयार झालेला आहे. सरकारचे कायदे, धोरणांविरोधात केलेल्या आंदोलनांवर या कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार नाही. ज्या संघटनांचं उद्दिष्टच अशा प्रकारच्या कडव्या डाव्या विचारसरणीला खतपाणी घालण्याचं आहे, ज्यांना राज्यघटना, तिने दिलेल्या संस्था मान्य नाहीत, त्यांच्याविरुद्ध उभं राहण्याचं ज्यांचं उद्दिष्ट आहे, त्यांच्यावरच हा कायदा बंदी आणेल, असं मुख्यमंत्र्यांनी या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना स्पष्ट केलं. त्यानंतर हे विधेयक मंजूर करण्यात आलं.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईतल्या विधानभवनातून, अंकिता आपटे.*

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ पर्यंत विधानसभा मतदार यादीत नाव नोंदवलेल्या मतदारांना मतदान करता येईल. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आज जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी हे निर्देश दिले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबिया या पाच देशांच्या दौऱ्यावरून आज नवी दिल्ली इथं परतले. या भेटीदरम्यान, प्रधानमंत्री मोदी यांनी भारताबरोबरचे संबंध अधिक दृढ करण्याबाबत चर्चा करण्यासाठी या देशांच्या प्रमुखांशी संवाद साधला. रिओ दि जानेरो इथं झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेलाही ते उपस्थित राहिले.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीमध्ये आज सकाळी ४ पूर्णांक ४ रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचा केंद्रबिंदु हरियाणातल्या झज्जर इथं असल्याचं राष्ट्रीय भूकंप शास्त्र केंद्रानं सांगितलं आहे.

<><><><><>

बिहारमध्ये मतदार याद्यांची विशेष पुनरीक्षण प्रक्रिया सुरु ठेवण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिली आहे. या प्रक्रियेदरम्यान आधार, रेशन कार्ड आणि मतदार ओळखपत्र यासारखी महत्त्वाची ओळखपत्र स्वीकारावीत, असं न्यायालयानं म्हटलं आहे. मतदार याद्यांचं पुनरिक्षण, ही प्रक्रिया संविधानाच्या कक्षेत असली, तरी त्यासाठी  निवडणूक आयोगानं साधलेली वेळ अनाकलनीय असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे. विशेष पुनरिक्षण प्रक्रिया बिहार निवडणुकांच्या वेळीच का होत आहे, आणि निवडणुका असोत, अथवा नसोत, ही प्रक्रिया संपूर्ण देशात का राबवली जाऊ शकत नाही, असा प्रश्न न्यायालयानं विचारला आहे. निवडणूक आयोगाला नागरिकत्वाची पडताळणी करायची होती, तर  हे काम यापूर्वीच व्हायला हवं होतं, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सुधारित अर्ज यादीचा मसुदा येत्या ऑगस्टमध्ये प्रकाशित केला जाईल हे लक्षात घेऊन, सर्वोच्च न्यायालयानं हे प्रकरण २८ जुलै रोजी नियमित खंडपीठासमोर पुढल्या सुनावणीसाठी ठेवलं. दरम्यान, या मोहिम आधार कार्ड पुरावा म्हणून स्वीकारला जात असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यातल्या गंभीरा गावानजीक झालेल्या पूल दुर्घटनेतल्या बळींची संख्या १५ पर्यंत पोचली आहे. आज आणखी ३ मृतदेह सापडले असून ४ नागरिक अद्याप बेपत्ता असल्याचं जिल्हाधिकारी अनिल धमेलिया यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकासह गुजरात राज्याच्या आपत्ती निवारण पथकाची शोध मोहीम अजूनही सुरु आहे.

<><><><><>

आयपीएलच्या २०२५च्या हंगामात झालेल्या तिकीट घोटाळ्याप्रकरणी तपास गुन्हे अन्वेषण विभागाने हैदराबाद क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगन मोहन राव

यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांना अटक केली आहे. हैदराबाद इथे राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये हा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. सनरायझर्स हैदराबाद या संघाने असोसिएशनवर मोफत तिकीटांसाठी धमकी दिल्याचा आरोप केला होता.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज लॉर्ड्स मैदानावर सुरू आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. इंग्लंडचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद झाले. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या २ बाद १५१ धावा झाल्या होत्या.

पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

**<><><><><>**

विम्बल्डनमध्ये सध्या अरीना साबालेंका आणि अमांडा ॲनिसिमोव्हा यांच्यात महिला एकेरीच्या उपांत्य फेरीचा पहिला सामना सुरू आहे. दुसरा सामना इगा श्वियांतेक आणि बेलिंडा बेंचिच यांच्यात होणार आहे. पुरुष एकेरीत उद्या उपांत्य फेरीत नोव्हाक जोकोविचचा सामना अग्रमानांकित यानिक सिनर याच्याशी होईल.

**//<><><><><>//**